## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क / ई-सुविधा शुल्क / विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणेबाबत तसेच सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय/तुकडी बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांनी त्यांच्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये विद्यापीठ मान्यता असलेल्या अभ्यासक्रमासाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क, ई-सुविधा शुल्क तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे. वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत -

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिवर्षीप्रमाणे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे नियमित वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणेची अंतिम तारीख (निरंतर संलग्नीकरण मिळाले असले तरी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे.) लेखाशिर्षक - A-2-R-1 | दि.३१ जुलै, २०१८ पर्यंत. |
| २. | विलंब शुल्कासह वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याची तारीख -<br>१. विहित शुल्क + विहित शुल्काच्या १० % विलंब शुल्क | ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत. |
| | २. विहित शुल्क + विहित शुल्काच्या २० % विलंब शुल्क | ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत. |
| | ३. विहित शुल्क + विहित शुल्काच्या २५ % विलंब शुल्क | ३१ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत. |
| ३. | उपरोक्त तारखांपर्यंत जी महाविद्यालये वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणार नाहीत ती महाविद्यालये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार योग्य त्या कारवाईस पात्र समजण्यात येतील. | |
| ४ | महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेस स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरही वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, सदरचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क प्रतिवर्षी न भरता स्वायत्तता प्राप्त झालेल्या कालावधीसाठी एकरकमी शुल्क भरणे आवश्यक आहे. | |
| ५. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. | |
| ६. | संदर्भ क्र.:संलग्नता/टी-२/८८, दि.२८ जुन, २०१८ च्या परिपत्रकामध्ये निर्धारित केल्यानुसार वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरावे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD → Affiliation T-2 Circulars या लिंकवर उपलब्ध आहे. | |
| ७. | शासन निर्णय क्रमांक ई सेवा २००६/(१९१/०६)/मशि-१, दि.१९ जून,२००६ नुसार प्रती विद्यार्थी रू.५०/- प्रमाणे प्रतिवर्षी ई-सेवाशुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचा शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD → Affiliation T-2 Circulars या लिंकवर उपलब्ध आहे. (लेखा शिर्षक - E-4-R-11) | |
| ८. | विद्यापीठ परिनियम ५९० नुसार पारंपारिक पदव्युत्तर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्क विहीत केल्यानुसार भरणे आवश्यक आहे. (लेखा शिर्षक - A-2-R-2) | |
| ९. | सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा/अभ्यासक्रम/ विषय/तुकडी बंद करण्याबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १२१ नुसार विद्यापीठाकडे दि.०१ ऑगस्ट,२०१८ किंवा त्यापूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत शुल्क भरून सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. | |
| १०. | जी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल विद्यापीठाशी (बाटू) संलग्न झाली आहेत, त्या महाविद्यालयांनी तसेच स्वायत्त विद्यापीठ म्हणून दर्जा प्राप्त केलेल्या महाविद्यालयानेसुध्दा सदर महाविद्यालयांचे काही वर्षांचे अभ्यासक्रम अद्यापि शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असल्याने सदर अभ्यासक्रमांचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे. | |
| ११. | **बरीच महाविद्यालये वार्षिक संलग्नीकरण शुल्क अथवा अन्य संलग्नीकरणाची शुल्के बँकांमधून परस्पर विद्यापीठाच्या खात्यावर भरतात. तथापि, अशा प्रकारे भरणा केलेल्या रक्कमेची पावती विद्यापीठात दाखवून त्याची रितसर जमा पावती अंतिम तारखेपूर्वी करणे आवश्यक आहे. अंतिम तारखेनंतर नियमानुसार विलंब शुल्क आकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.** | |

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

संदर्भ क्र.: संलग्नता टी-२/ 92
दि. - 4 JUL 2018

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रत :- १) पात्रता विभाग २) नगदी विभाग